# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART – TWO


## गुरुवार, दिनांक २८ डिसेंबर, २०१७

## अधिसूचना

क्रमांक : १६०/२०१७ दिनांक : २८.१२.२०१७

**विषय : २०१६-२०१७ शैक्षणिक सत्राची स्व. श्री शंकरराव गोविंद जोग व श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्ती.**

सर्व संबंधितांचे माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, स्व. श्री शंकरराव गोविंद जोग व श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्ती दाननिधी विनियमातील तरतुदीप्रमाणे, उन्हाळी २०१६ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षा, विज्ञान स्नातक भाग - १ व भाग - २ या परीक्षांमध्ये पदार्थ विज्ञान या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करुन प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण होणारे व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अनुक्रमे विज्ञान स्नातक भाग -१, भाग - २ व भाग - ३ च्या अभ्यासक्रमास पदार्थ विज्ञान विषयासह २०१६-२०१७ शैक्षणिक सत्रामध्ये प्रवेश घेतलेले खाली नमूद केलेले विद्यार्थी २०१६-२०१७ शैक्षणिक सत्राची स्व. श्री शंकरराव गोविंद जोग व श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्तीकरीता पात्र ठरले आहेत.

२०१६-२०१७ या शैक्षणिक सत्राची उपरोक्त शिष्यवृत्ती खालील विद्यार्थ्यांना त्यांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव व महाविद्यालय | उत्तीर्ण परीक्षा | प्रवेशित वर्ग | प्राप्त गुण | शिष्यवृत्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | **श्री राहूल विठ्ठल अल्हाट**<br>श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला | H.S.S.C. | B.Sc. I | 94 | 500.00 |
| ०२. | **कु. पुजा पंजाबराव पवार**<br>विवेकानंद विज्ञान महाविद्यालय, हिवरा आश्रम, ता.तेल्हारा जि.बुलढाणा | B.Sc. I (Sem I+II) | B.Sc. II (Sem III) | 287 | 500.00 |
| ०३. | **कु. रोहीणी सुनिल डागदीया**<br>आर.ए. महाविद्यालय, वाशिम | B.Sc. II **(Sem III+IV)** | B.Sc. III **(Sem V)** | 285 | 250.00 |
| ०४. | **कु. रुची सुशिलकुमार चावला**<br>विद्याभारती महाविद्यालय, अमरावती. | B.Sc. II **(Sem III+IV)** | B.Sc. III **(Sem V)** | 285 | 250.00 |

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

## अधिसूचना

क्रमांक : १६१/२०१७ दिनांक : २८/१२/ २०१७

**विषयः- हिवाळी-२०१७ परीक्षेपासून परीक्षा केंद्रांना देण्यात येणाऱ्या देखभाल खर्चात वाढ करण्याबाबत.**

सर्व संबधितांच्या माहितीकरीता सूचित करण्यात येते की, दिनांक ०७/१२/२०१७ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत बाब क्रमांक १८७ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार विज्ञान व अभियांत्रिकी, वाणिज्य आणि व्यवस्थापन, मानवविज्ञान, आंतर-विद्याशाखीय अभ्यास या ४ (चार) विद्याशाखेतील अभ्यासक्रमांकरीता ऑनलाईन पध्दतीने **(अभियांत्रिकी व तांत्रिकी, विधी व भेषजी परीक्षा सोडून)** प्रश्नपत्रिका वितरण करण्यासाठी थेट गोपनीय छपाईदारांकडून संबंधित परीक्षा केंद्रांना प्रश्नपत्रिकेचे वितरण करण्यास्तव देखभाल खर्च रुपये १८/- ऐवजी रुपये २०/- (रुपये वीस फक्त) देय राहील. या देखभाल खर्चाची पूर्तता परीक्षा केंद्राला परीक्षा संचालनासाठी विद्यापीठाकडून दिल्या जाणाऱ्या अग्रीमातून करण्यात यावी. सदर बाबीची अंमलबजावणी हिवाळी-२०१७ परीक्षेपासून लागू राहील.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ